# उपनिबंधक सहकारी संस्था पी विभाग, मुंबई

**रुम नं. ३०३, तिसरा मजला अे विंग, बी. एम. सी. गोडावुन बिल्डिंग, संस्कृती कॉम्प्लेक्स जवळ, ठाकुर कॉम्प्लेक्स, ९० फुट रोड, कांदीवली (पुर्व) मुंबई ४०० १०१.**

---

जा. क्र. मुंबई/उपनि/पी विभाग/८३(१)आदेश/बी-१/ १६०२ /२०१८
दिनांक :- १० / ४ /२०१८

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३(१) अन्वये आदेश

वाचावे :- १) महाराष्ट्र सहकारी संस्था १९६० चे कलम ८३(१) मधील तरतूदी.
२) सचिव यांचे दि. २२/०१/२०१८ चे पत्र.

ज्याअर्थी, **पिकॅडली II को-ऑप. हौ. सोसा. लि., रॉयल पाम इस्टेट, आरे कॉलनी, गोरेगाव (पू), मुंबई - ४०० ०६५** या संस्थेची नोंदणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतूदीनुसार झालेली असून सदरची संस्था या कार्यालयाच्या अधिकार कक्षेमध्ये येते आणि,

ज्याअर्थी, सदर संस्थेचे दैनंदिन कामकाज हे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ संस्थेची नोंदणीकृत उपविधीतील तरतुदीनुसार व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार चालविणे संस्थेस बंधनकारक आहे. आणि.,

ज्याअर्थी, संस्थेचे सचिव यांनी त्यांचे संदर्भिय पत्रान्वये या कार्यालयाचे असे निदर्शनास आणून दिले आहे की, सन २०१२-२०१३, २०१३-२०१४ व २०१४-२०१५ या कालावधीमध्ये रक्कम रु. ८७,००,०००/- (अक्षरी रुपये सत्त्याऐंशी लाख मात्र) चा अपहार केलेला आहे. सदर व्यवहाराबाबत कायदा कलम ८३(१) अन्वये चौकशी करावी.

वरील परिस्थिती विचारात घेता संस्थेच्यावतीने मागणी केल्यानुसार संस्थेची रचना तिचे कामकाज तसेच आर्थिक स्थिती यावरुन महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३(१) खाली चौकशी अधिकाऱ्याची नेमणूक करणे आवश्यक आहे. अशी माझी खात्री झालेली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## -: आदेश :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३(१) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, जे. डी. पाटील, उपनिबंधक, सहकारी संस्था पी विभाग, मुंबई याद्वारे **पिकॅडली II को-ऑप. हौ. सोसा. लि., रॉयल पाम इस्टेट, आरे कॉलनी, गोरेगाव (पू), मुंबई - ४०० ०६५** या

संस्थेच्या संदर्भात परिशिष्ट - अ मधील मुद्दयावर चौकशी करणेकामी **श्री. अशोककुमार अनराजी जैन - सनदी लेखापाल** यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करत आहे. त्यांनी ०३ महिन्यांच्या आत चौकशी करुन चौकशी अहवाल कार्यालयास सादर करावा. चौकशीपोटी रु. २५,०००/- जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (४), मुंबई या कार्यालयाचे खात्यात जमा करावा.

हा आदेश आज दिनांक १० /४ /२०१८ माझे सहीने व या कार्यालयाचे मुद्रेसह दिला आहे.

उप-निबंधक सहकारी संस्था, पी विभाग, मुंबई
OFFICE OF THE DEPUTY REGISTRAR C.S. P WARD MUMBAI

**(जे. डी. पाटील)**
उपनिबंधक,
सहकारी संस्था पी विभाग, मुंबई

**प्रत :-**

१) चेअरमन/सेक्रेटरी, **पिकॅडली II को-ऑप. हौ. सोसा. लि., रॉयल पाम इस्टेट, आरे कॉलनी, गोरेगाव (पू), मुंबई - ४०० ०६५.**

आपणांस कळविण्यांत येते की, त्यांनी चौकशी फी पोटी वरील रक्कम जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (४), मुंबई, भंडारी बँक इमारत, दुसरा माळा, प्र. ल. काळे गुरुजी मार्ग, दादर (प), मुंबई - ४०० ०२८.

२) **श्री. अशोककुमार अनराजी जैन - सनदी लेखापाल.**

आपणांस कळविण्यांत येते की, परिशिष्ट - अ मधील मुद्दयांची ०३ महिन्यांच्या आत चौकशी करुन चौकशी अहवाल या कार्यालयास सादर करावा.

उपनिबंधक,
सहकारी संस्था पी विभाग, मुंबई

12/04/18